1

# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.

## अर्थ प्रशासन विभाग,

पी. ओ. कृषि नगर, अकोला - ४४४१०४ (महाराष्ट्र)

दुरध्वनी :- ०७२४२२५८४६९
नियंत्रक
ई -मेल: comptroller@pdkv.ac.in

---

जा.क्र./अप्रवि/७ वा वे. आ. थकबाकी/ १४८४ /२०२३ दिनांक: ०१/११/२०२३

**तात्काळ/ कालमर्यादा**

संदर्भ :- मा. उप माहनिर्देशक, (कृषि शिक्षा) यांचे पत्र File No. Agril. Eds. 17-8/2018-A&P(Pt.)(e-37512) Dated 31.10.2023

# परिपत्रक

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत सर्व आहरण व सवितरण अधिकारी, यांना कळविण्यात येते की, दिनांक १२ ऑगस्ट २०२१ रोजी कृषि व पदुम विभाग महाराट्र शासन यांनी शासन निर्णयाद्वारे राज्यातील कृषि विद्यापीठातील शिक्षक वर्गिय अधिकारी/कर्मचारी यांना ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशी प्रमाणे सुधारीत वेतन श्रेणी लागु केली. उपरोक्त शासन निर्णयातील मुख्य प्रस्तावना तथा मुददा कमांक १९ (२) नमुद केल्या प्रमाणे **दिनांक ०१.०१.२०१६ ते ३१.०३.२०१९** या कालावधीत शिक्षकवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांना अनुज्ञेय रक्कमेच्या ५० टक्के रकमेचा वाटा भाकृअप नवी दिल्ली देईल व उर्वरीत ५० टक्के रकमेचा भार राज्य शासन अचलेल भाकृअपच्या **दिनांक ३१.१०.२०२३** च्या संदर्भाकित पत्रानुसार शिक्षक वर्गीय अधिकारी/कर्मचा-याच्या थकबाकीच्या रक्कमा प्रदान करण्यासंबधात सुधारीत निर्देश प्राप्त झालेले आहे. त्याअनुषंगाने सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांना सुचित करण्यात येते की, दिनांक ०१.०१.२०१६ ते ३१.०३.२०१९ या कालावधीतील शिक्षकवर्गीय अधिकारी/कर्मचारी **(भाकृअप ७५:२५ योजनेतील (AICRP) व कृषि विज्ञान केंद्र (KVK) येथे कार्यरत शिक्षकवर्गीय अधिकारी/कर्मचारी वगळुन)** यांना प्रदान करावयाची फरकाची रक्कम अचुक पणे गणना करुन, तपासुन या परिपत्रकासोबत सहपत्रीत केलेल्या **प्रपत्र अ व ब** भरुन स्वाक्षरित करुन संबधित वेतन व लेखाधिकारी अकोला व वेतन व लेखाधिकारी, नागपुर यांना दिनाकं १०.११.२०२३ पर्यत हार्ड व सॉफ्ट कॉपीमध्ये सादर करावी व संपुर्ण माहितीची एक प्रत संबधित वेतन व लेखाधिकारी अकोला याना Pao_akola@pdkv.ac.in व वेतन व लेखाधिकारी, नागपुर ngpao@gmail.com मेल आय डी वर पठविण्यात यावी.

उपरोक्त माहिती ही प्रदानाकरीता अंतीम स्वरुपाची असल्याने सर्व आहरण व सवितरण अधिकारी यांनी ती काळजीपुर्वक तयार करावी त्याची योग्य तपसणी करावी, व त्यास अनुप्रमाणीत करुन जर विहीत मर्यादत माहिती सादर न केल्यास व भविष्यात या कारणाने अनुदान उपलब्ध न होउन कोणत्याही शिक्षकवर्गीय कर्मचा-याच्या थकबाकीचे प्रदान होउ न शकल्याने आर्थीक देयता निर्माण झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबधित आहरण व सवितरण अधिकारी यांचीच राहील याची कृपया नोंद घ्यावी. करीता सदर प्रकरणास प्राथम्यकम द्यावे.

**सोबत- प्रपत्र अ व ब**

नियंत्रक
डॉ. पं. दे. कृ. वि.अकोला

/

प्रतिलिपी,

१.मा. कुलगुरु महोदय यांचे स्विय सहायक यांना मा. कुलगुरु महोदय यांच्या माहिती करीता सादर.

२.मा. कुलसचिव, डॉ. पं.दे.कृ. वि.अकोला यांना माहितीकरीता सादर.

३.मा__________________ नियंत्रक अधिकारी, यांना माहिती करीता तथा उचित कार्यवाही करीता सादर

४.वेतन व लेखाधिकारी, अकोला यांना सुचित करण्यात येते की, वरिल माहिती विहित कालावधीत प्राप्त माहिती संकलन करुन सादर करावे.

५.वेतन व लेखाधिकारी, नागपुर यांना सुचित करण्यात येते की, वरिल माहिती विहित कालावधीत प्राप्त माहिती संकलन करुन सादर करावे

६. विभाग प्रमुख संगणक विभाग यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठाच्या वेब साईट वर प्रकाशित करण्यात यावे.

नियंत्रक
डॉ. पं. दे. कृ. वि.अकोला

## प्रपत्र अ) Teacher यांची माहिती

| Sr. No | Name of Employees | Salary Difference period Amount (Rs. ) | | | | Total Rs. 3+4+5+6 | ICAR share 50 % ---------- Colum No.07 in 50% | State share 50 % ---------- Colum No.07 in 50% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 01.01.2016 to 31.12.2016 | 01.01.2017 to 31.12.2017 | 01.01.2018 to 31.12.2018 | 01.01.2019 to 31.03.2019 | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| | | | | | | | | |

स्वाक्षरी

आहरा व सवितरण अधिकारी

## प्रपत्र ब) Equivalent Cadre यांची माहिती

| Sr. No | Name of Employees | Salary Difference period Amount (Rs. ) | | | | Total Rs. 3+4+5+6 | ICAR share 50 % ---------- Colum No.07 in 50% | State share 50 % ---------- Colum No.07 in 50% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 01.01.2016 to 31.12.2016 | 01.01.2017 to 31.12.2017 | 01.01.2018 to 31.12.2018 | 01.01.2019 to 31.03.2019 | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| | | | | | | | | |

स्वाक्षरी

आहरण व सवितरण अधिकारी

**टिप :– वरिल माहिती तयार करतांना प्रथम नावा पासुन सुरवात करावी व माहिती Calibri (Body) इंग्रजी या फॉट मध्ये देण्यात यावी.**